# मामाच्या गावाला

## लेखक : प्रल्हाद जाधव

पात्रे :

राजू : (१४)

बेबी : (१०)

मम्मी :  (४०)

मामा : (३५)

मामी : (३०)

प्रवेश पहिला

(प्रकाश उजळतो. वेळ दुपारची. मुंबईतील एका मध्यमवर्गीय घराचा हॉल. सुट्टीचा दिवस. रेडिओवर 'झुकुझुकु झुकुझुकु, आगीनगाडी' हे गाणे सुरू आहे. त्या तालावर राजू आणि बेबी धमाल करत नाचत आहेत. तोंडानीच इंजिनच्या शिट्टीचा आवाज काढत 'मामाच्या गावाला जाऊ या' म्हणत एकमेकांच्या मागे लागले आहेत.)

मम्मी : (आतूनच) गप्प बसा रे कार्ट्यांनो! (राजू आणि बेबीचा धुमाकुळ चालूच. अखेर वैतागून ती बाहेर येते-) बाई-बाई, बाई-बाई! कहरच केला अगदी या मुलांनी!

दोघेही : (तोंडानी शिट्टी वाजवत पळत आहेत) कुऽऽ कुऽऽ, कुऽऽ कुऽऽ ...

मम्मी : अरे गप्प बसा म्हणते ना? डोकं उठवलंत माझं. जरा कुठं आवरत होते तेवढ्यात सुरू झालं तुमचं 'मामाचं गाव!' गप्प बसा म्हणते ना! तोंडातून एक शब्द काढलात तरी जिभेवर डाग देईन एकेकाच्या चांगला!

राजू : मम्मी मम्मी, तू आम्हाला मामाच्या गावाला नेत नाहीस ना म्हणून आम्ही आपलं मामाच्या गावाला जाण्याचं गाणंच म्हणतोय; हो की नाही ग बेबी?

बेबी : हो ना! नुसतं गाणं म्हणूनच मामाच्या गावाला जाण्याचा आनंद मिळवतोय, दुसरं काय?

मम्मी : अरे पत आत्ता गणपतीच्या सुट्टीत जाऊन आलो ना आपण तिकडे? सारखं सारखं काय जेवण वाढून ठेवलंय का तिथं?

बेबी : मामीच्या हातच्या जेवणाची नुसती आठवण झाली तरी तोंडाला पाणी सुटतं. व्वा, क्या बात है! काय ती गरम गरम तांदळाची भाकरी...

राजू : ताजी ताजी मठाची भाजी...

बेबी : ताज्या ताज्या कैऱ्यांचं लोणचं...

राजू : चांगला टमटमीत कांदा... रसरशीत टॉमेटो.

बेबी : सोबत हिरव्यागार मिरच्यांचा ठेचा...

राजू : वर घरच्याच म्हशीचं तूप...

मम्मी : बाई, बाई-बाई-बाई ! काय सवकल्यात तुमच्या जिभा! आणि काय रे, मी रोज रोज काय पिठलं-भात करून घालते की काय तुम्हाला?

बेबी : पिठलं-भातसुद्धा किती छान करते मामी!

मम्मी : आणि मी नाही करत? वर तुमच्या त्या गाण्यात म्हटल्याप्रमाणे "रोज रोज पोळी - शिकरण आणि अधून- मधून गुलाबजामसुद्धा करते की नाही?

बेबी : तसे आम्हाला 'गुलाबजाम' मिळतात पण–

मम्मी : पण काय?

राजू : तुझ्या ‘गुलाबा’मध्ये गुलाब कुठेच नसतात; काटे मात्र ‘ज्याम’ असतात!

मम्मी : अस्सं?

बेबी : आणि बरं का मम्मी, तुझ्या हातचं ‘शिकरण’ खाल्लं ना, की हमखास ‘जागरण’ होतं...

मम्मी : ते का ग कार्टे?

बेबी : ते खाल्लं की शिंका यायला लागतात आणि ‘शिक’ पडल्यामुळे जागं राहावं लागतं.

(मम्मीची अशी फिरकी ताणत दोघेही खिदळत आहेत. ती त्यांच्या मागे मागे. तिच्या तावडीत सापडू नये म्हणून दोघेही पळापळी करत आहेत)

मम्मी : तुमच्या एकेकाच्या जिभेवर आता अगदी चरचरून डाग देते चांगला, त्याशिवाय सुधारणार नाही तुम्ही. (तोवर राजू एका उंच जागी जाऊन उभा राहिलेला आहे.)

राजू : (हातातील पत्र फडकवीत) डाग खुशाल दे मम्मी! पण त्या आधी जरा हे पत्र वाच बघू!

मम्मी : अगबाई पत्रं? आणि ते कधी आलं? बघू बघू कुणाचं आहे ते!

राजू : हं, घे! (हुलकावण्या देत ती पुरेशी त्रासलेली आहे हे पाहून देतो.)

मम्मी : (पहात) छान! आधीच फोडलेलं दिसतंय तुम्ही! बघुया कुणाचय ते! (मोठ्यानं वाचू लागते)

प्रिय सौ. ताई या उभयतांस,

आपला भाऊ शंकरदादा याचा दंडवत.

पत्रास कारण की सौ. पार्वती नुकतीच बाळंत झाली. मुलगा झाला. बाळ- बाळंतीण सुखरूप आहेत. येत्या रविवारी बारसे धरले आहे. तरी वेळात वेळ काढून यावे. वाट पहात आहे.

आपला,

शंकर.

ता. क. - येताना राजूला आणि बेबीला जरूर जरूर आणावे.

दोघेही : (आनंदाने) मामा-मामी ऽऽऽ झिंदाबाद!

राजू : मामा मामा मामा मामी ऽऽऽ

बेबी : झिंदा झिंदा झिंदाबाद ऽऽऽ

राजू : मामा-मामीचा ऽऽऽ

बेबी : विजय असो ऽऽऽ

मम्मी : बाई-बाई-बाई बाई! अरे काय मोर्चा-बिर्चा आणलात की काय घरावर?

राजू : होय बरोबर ओळखलंस मोर्चाच आणलाय. (ओरडत) आमच्या मागण्या ऽऽऽ

बेबी : मान्य करा ऽऽऽ

राजू : नाहीतर खूर्च्या ऽऽऽ

बेबी : खाली करा!

मम्मी : बरं बरं, काय मागण्या आहेत तुमच्या?

बेबी : आमची फक्त एकच मागणी आहे.

राजू : आम्हाला मामाच्या गावी जायचे आहे. काय वाट्टेल ते झालं तरी चालेल पण आम्ही मामाच्या बारश्याला जाणारच!

बेबी : (खिदळत) मामाच्या नाही, मामाच्या मुलाच्या बारश्याला!

राजू : तेच ते!

मम्मी : आणि समजा मी जर तुमची ही मागणी मान्य केली नाही तर काय करणार तुम्ही माझं?

बेबी : आम्ही पप्पाकडे तक्रार करू.

मम्मी : काय तक्रार करणार?

बेबी : आम्ही त्यांना सांगू की ही मम्मी आमच्यावर अन्याय करते. तिला बदलून तिच्या जागी दुसरी मम्मी आणा!

मम्मी : असं सांगणार तुम्ही त्यांना?

राजू : सांगणार म्हणजे सांगणार–

बेबी : अगदी त्रिवार सांगणार!

मम्मी : खुशाल सांगा, घाबरतंय कोण तुमच्या पप्पाना? मम्मी म्हणजे काही सरकार नाही सारखं सारखं बदलायला!

राजू : आम्ही पटवून देऊ पप्पांना!

मम्मी : काय पटवून देणार? तुम्हाला माहीत आहे ना, पप्पा काल नागपूरला गेलेत ऑफिसच्या कामासाठी? चांगले आठदहा दिवस राहाणार आहेत ते तिकडे! ते आले की खुशाल तक्रार करा. तोवर मी शंकरदादाकडे बारशाला जाऊन येते!

राजू : म्हणजे आम्हाला नेणार नाहीस तू?

मम्मी : एकदा नाही म्हटलं की समजतं ना?

बेबी : खरंच नाही नेणार?

मम्मी : नाही, नाही, त्रिवार नाही!

बेबी : (रडकुंडीला येत) असं काय करतेस मम्मी? प्लीज... घेऊन जा ना आम्हाला...

राजू : मम्मी प्लीज... तू कित्ती चांगली आहेस.

बेबी : हो किती चांगली आहेस ग तू मम्मी!

मम्मी : लाडीगोडी लावून काही फायदा नाही.

बेबी : पण आम्हाला नेण्यात तुझी अडचण काय? डोकीवरनं उचलून न्यायचंय का आम्हाला?

मम्मी : गाड्यांना गर्दी किती वाढलीय बघताय ना? त्यात आयत्यावेळी रिझर्व्हेशनसुद्धा मिळणार नाही. या गर्दीतून मी तुम्हाला नेऊ शकत नाही!

बेबी : कसली गर्दी आलीय, म्हशीची शिंग काही म्हशीला जड होत नाहीत!

मम्मी : (किंचाळत) काय? काय म्हणालीस बेबी?

बेबी : म्हशीची शिंग म्हशीला जड होत नाहीत!

मम्मी : स्वतःच्या आईला म्हैस म्हणतेस?

बेबी : तसं नव्हतं म्हणायचं मला!

मम्मी : उद्या बाबाना रेडा म्हणशील...

राजू : म्हणजे आपलं घर हा एक गोठा झाला... (म्हॅऽऽऽ करून ओरडतो)

मम्मी : तू चूप रे! (बेबीला) स्वत:च्या आईला म्हैस म्हणतेस? तुझ्या जिभेवर डाग देते चांगला.

बेबी : तसं नाही गं मम्मी, काल आम्हाला वर्गात वाक्प्रचार शिकवलेत. म्हशीची शिंग काही म्हशीला जड होत नाहीत' हा त्यातलाच एक. गुरूजींनी सांगितलंय की वाक्प्रचारांचा बोलण्यात नेहमी उपयोग करत जा म्हणून.

मम्मी : पण म्हणून काय स्वत:च्या आईचा वाक्यात उपयोग करायचा? ते काही नाही, आता मी तुम्हाला सोबत नेणार तर नाहीच पण कशी अद्दल घडवते तेही बघा!

राजू : आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार?

मम्मी : छान! तुही केलास वाटतं स्वत:च्या मम्मीचा वाक्यात उपयोग?

राजू : हे बघ, तुझ्याइतकी प्रेमळ मम्मी या जगात शोधून सापडणार नाही. तू आम्हाला शिक्षा करणं शक्य नाही, म्हणूनच म्हटलं की आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार? (बेबीला) आहे की नाही ग आपली मम्मी प्रेमळ?

बेबी : अगदी प्रश्नच नाही. 'मातृ देवो भव!', स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी, “आईसारखे दैवत साऱ्या जगतामधी नाही " बोला मम्मीचा ऽऽऽ

राजू : विजय असो.

बेबी : मम्मीचा ऽऽऽ

राजू : विजय असो!

राजू : (बेबीला) चल आपण दोघेही मिळून मातेचे दर्शन घेऊया! (दोघेही तिला लोटांगण घालतात आणि तिचे पाय पकडून ठेवतात.)

मम्मी : अरे अरे अरे अरे! काय नाटक संचारलंय  का काय तुमच्या अंगात?

बेबी : तू आम्हाला नेणार की नाही सांग!

मम्मी : तुम्ही कितीही कल्पना लढवल्यात तरी मला दया येणार नाही. तुमच्यासारखी आगाऊ मुलं असण्यापेक्षा नसलेली बरी!

राजू : (रडवलेल्या सुरात) खरंच का ग मम्मी आम्ही तुला नकोसे झाले आहोत?

बेबी : सांग, खरंच आम्ही तुला नको झालोत का?

राजू : आम्ही चेष्टा करत होतो तुझी एवढं पण कळत नाही का तुला?

मम्मी : चेष्टा करत होता?

राजू :  हो ना, वाटल्यास माफी मागतो तुझी.

दोघेही :  सॉरी मम्मी सॉरी! परत तुला त्रास होईल असं कधीही वागणार नाही.

मम्मी : (त्यांना कुशीत घेत) नाही रे बाळांनो! कशाला माफी मागताय माझी? तुम्ही दोघे म्हणजे माझे अगदी चंद्रसूर्य आहात. माझ्या काळजाचे तुकडे आहात. मला अगदी हवेहवेसे आहात...

राजू : तर मग जायचं ना मामाच्या गावाला?

मम्मी : हो! चला तयारीला लागा!

(दोघेही आनंदाने आरडाओरडा करायला लागतात. प्रकाश हळू हळू कमी होत जातो. “मम्मी माझा निळा फ्रॉक कुठाय, ” माझी वॉटर बॅग घे गं मम्मी”, “अरे हा चिवड्याचा डबा वरच्याच पिशवीत ठेवा,” “मम्मी गं ट्रेनमध्ये वाचायला कॉमिक्स घेऊ का गं” अशी वाक्ये अंधारातून ऐकू येतात. मग एकदम आगगाडीची शिट्टी ऐकू येते. पाठोपाठ तिच्या धडधडत जाण्याचा आवाज. तो आवाज हळू हळू कमी होत जातो.  नंतर काही क्षणांनी बैलाच्या गळ्यातील घुंगुरांचा आवाज येतो. राजू आणि बेबी खुषीतच “माझ्या मामाची रंगीत गाडी हो, तिला खिल्लाऱ्या बैलांची जोडी हो” हे गाणं म्हणत आहेत. मधुनच “थुर्रऽऽ हैक ! हैक” असा, बैल हाकलताना काढतात तसा गाडीवानाचा आवाज येत आहे...पूर्ण अंधार.)

प्रवेश दुसरा

(पुन्हा प्रकाश. संगीत. आता ते मामाच्या गावी पोचलेले. मामाचे घर. सारे दरवाजात उभे. बाहेर अंगण. तुळशी-वृंदावन. राजूने मुंबई-स्टाईल रंगीबेरंगी स्वेटर घातलेले. डोक्यावर कॅप, हातात बॅग. बेबीने डोक्याला रूमाल बांधलेला. खांद्याला वॉटर-बॅग. मम्मीसुद्धा 'सहलस्नेही' वेषात.)

राजू आणि बेबी : माऽऽ माऽऽ आम्हीऽ आलोऽऽ मामाऽऽऽ आम्ही आलो...

मामा : (बाहेर येत) आरं वा-वा-वा आली का माजी लेकरं? तुमी आलाव पोरांना लई ब्येस झालं. या अशी– या! (दोघेही मामाकडे झेपावतात. तो त्यांना दोन्ही कडेवर घेतो. (ताईला) या की ताईसाब! (तिच्याकडची पिशवी घेत) अंगं अस्सं्ऽऽऽ आन् भावोजी कुठं हैत म्हणायचं?

मम्मी : ते कामासाठी नागपूरला गेलेत. अचानक पत्र आलं तुझं नाहीतर तेही आले असते.

मामा : बारं - बारं...

मम्मी : वहिनीची तब्येत कशी काय?

मामा : झ्याक हाय की एकदम!

मम्मी : आणि बाळ?

मामा : त्ये तर एकदम भारी म्हणायचं

राजू : मामाऽऽ, मला आधी बाळ बघायचंय!

बेबी : मलासुद्धा बाळ बघायचंय मामा.

मम्मी : कधी एकदा तुझं कोकरू बघीन असं झालंय मलासुद्धा!

बेबी : (खिदळत) कोकरू? पण कोकरू तर बकरीला होत नां?

मम्मी : अगं, बाळाला लाडानं कोकरू म्हणतात.

राजू : एवढंपण समजत नाही? येडपट कुठली!

बेबी : हॅ ऽऽऽ, मोठा शहाणा!

राजू : मामा तू आधी आम्हाला बाळ दाखव बरं.

मामा : आरं पन मंडळी आदि हात-पाय-त्वांड धुवा. च्या-पानी घ्या आन मंग बाळाला बघा. दमूशान आला नव्हं तुम्ही?

बेबी : दमून 'शान'? (खिदळते. राजूची साथ)

मामा : आता हासायासारकं म्या काय वंगाळ बोललू का?

मम्मी : अरे तू "दमून शान" म्हणालास ना, त्यातल्या 'श्यान'च त्यांना हसू आलं त्यांना.

मामा : आसं व्हय! आमी आडानी मानसं, आमचं शिक्शान झालेलं नाय. तवा आपल्या मामाला काहीच श्यानपन नाय आसं समजा तुम्ही.

राजू : बा बा बा बा! किती हे ‘श्यान’?

(सगळे हसतात)

मामा : बरं, बाळ बघायचंय नव्हं? ( हाक मारतो) पारूऽऽ आगं ए पारूऽऽ आगं भायेर बघितलंस का कोन कोन आलया ते?

(मामीची झोकदार एण्ट्री. खणाची चोळी, काठपदरी लुगडं, ठसठशीत कुंकु, नाकात नथ, डोईवरून पदर. तिच्या हातात बाळ. राजू आणि बेबी तिच्याकडे झेपावतात आणि बाळाला घेण्यासाठी हट्ट करू लागतात. पण मम्मी त्याला उचलते आणि आपल्याकडे घेत त्याची पापी घेते त्याला जोजवू लागते.)

बेबी : मम्मी, माझ्याकडे देना! अय्या, किती छान!

राजू : माझ्याकडे दे ना मम्मी. गाल बघ कसे लाल लाल आहेत त्याचे ते!

बेबी : आणि वाट बघ कसे लालचुटुक आहेत ते! देना माझ्याकडे!

मम्मी : हे बघा अजून बाळ लहान आहे. अजून मानही धरली नाही त्यांनं नीट. पडलं-बिडलं हातून तर? (तरीही दोघे हट्ट करत आहेत)

मामी : (मम्मीला) इक्ता हट्ट करत्यात तर द्याकी त्यांच्याकडं थोडा वेळ! (“बरं हे घे, पण सांभाळून!” असं म्हणत मम्मी बाळ बेबीच्या मांडीवर ठेवते. राजू तिच्या शेजारी बसून कौतुकाने पहात आहे.)

बेबी : बाळ बघा बाळ छान छान बाळ.

राजू : बाळाचे हात मऊ बाळाचे पाय मऊ.

बेबी : किती मऊ आहे, अगदी सशासारखं!

राजू : आणि रंग बघा कसा गोरापान. गुलाबी अगदी गुलाबाच्या फुलासारखा.

मामी : बरं बरं लई कौतुक करू नगसा त्याचं. नायतं दीठ लागल त्याला.

बेबी : दीठ लागंल? म्हणजे काय ग मामी?

मामी : दीठ लागंल म्हंजी काय ते ठावं नाय तुला?

बेबी : नाही बुवा!

मामी : मंग साळा कशापायी शिकला इक्ती?

बेबी : अगं मामी, आमच्या शाळेत असलं काही शिकवीत नाहीत.

राजू : अग दीठ लागलं म्हणजे दृष्ट लागेल.

मामी : (त्याला शाबासकी देत) आग आस्सं઼ऽऽऽ बालिस्टर व्हय रे शिकून माझ्या राज्या!

बेबी : बालिस्टर म्हणजे काय रे राजू?

राजू : अग बालिस्टर म्हणजे बॅरिस्टर. वेडी कुठली!

बेबी : कारे मला वेडी म्हणतोस? तूच वेडपट!

राजू : तू एक नंबरची वेडपट आहेस.

बेबी : (भांडत) आणि तू एक नंबरचा मूर्ख आहेस.

राजू : यू आर ॲन इडियट!

बेबी : यू आर अ डाँकी! (असे म्हणून डोक्याला हाताचे कान लाऊन गाढवासारखे हलवत जीभ बाहेर काढून त्याला वेडावून दाखवते. राजूही तिला तसेच प्रत्युत्तर देतो. दोघांच्याही त्या गोंधळात बाळ रडू लागते.) अले- अले-अले! असं ललायचं नाही. तो बघ काऊ आला, चिऊताई आली, माऊ आली, मॅव... मॅऽऽऽ व (बाळ रडायचे थांबते. बाळाकडे बघता बघता तिच्या मनात एक शंका निर्माण होते. ती राजूला हाक मारून तिकडे बोलावते. कुजबुजत राजूला ती शंका विचारते. पण तोही आपल्याला काही माहीत नसल्याचा अविर्भाव करतो. मग दोघेही मामा-मामीलाच काय ते विचारावयाचे ठरवतात. राजू जोरात हाक मारून मामाला बोलावतो.

राजू : मामा, एऽऽ मामाऽऽ

मामा : 'आलु आलु' (म्हणत येतो.

बेबी : मामी, इकडे ये जरा!

मामी : काय म्हणतेस ग पोरी?

(राजू आणि बेबी बाळासह इकडे तिकडे करत आपली शंका त्या दोघांना गाण्यातून विचारतात.)

राजू : मामा आणि मामी दोघे इकडे या हो असे इवलेसे हे बाळ आपल्या घरात आले कसे?

बेबी : काल नव्हते, परवा नव्हते, नव्हते सोमवारी सामानाच्या यादीतसुद्धा नव्हती याची स्वारी

राजू : कोठून आले, कसे आले इथेच आले कसे?

दोघे : इवलेसे हे बाळ आपल्या घरात आले कसे?

बेबी : इवले इवले बाळ त्याचे फुलासारखे अंग,

राजू : विचारावे त्यालाच तर ते अपुल्यामध्ये दंग

बेबी : पत्रही नाही, चिठ्ठी नाही, तरीही आले कसे?

दोघे : इवलेसे हे बाळ आपल्या घरात आले कसे?

राजू : मामी आणि मामा बोलत तुम्ही का नाही?

बेबी : कुठे बनवतात बाळ तुम्ही सांगत का नाही?

राजू : विचारावे एखाद्याला तर होते आमचे हसे

दोघे : इवलेसे हे बाळ आपल्या घरात आले कसे?

मामा : (गाणं संपता संपता) आरंररं... पोरांनो तुमास्नी साळत घाटलं ते लयी वंगाळ झालं बघा.

राजू : कारे मामा?

मामा : ल्हान मुलांनी आसं इचारायचं नस्तं....

बेबी : अगं पण मम्मी, हे बाळ कुठून आणलं असा प्रश्न विचारला तर त्यात काय चुकलं आमचं?

मामी : बाळांनो, आसं इचारायचं नसतं म्हनलं ना म्या? हे बाळ देवानं तुमास्नी भेट म्हनूनश्यान पाटवलंय, समाजलं?

राजू : पण ते इथंच कसं काय आलं नेमकं?

मम्मी : देवानं सुपातनं आपल्याकडं पाठवून दिलं.

बेबी : सुपातनं पाठवलं? मग घसरून कसं पडलं नाही ते?

राजू : (वर बघत) देवा! आता मामाचं दुसरं मूल सुपातनं पाठवायच्याऐवजी टोपलीतनं पाठव म्हणजे ते पडायचं नाही. (सर्व हसतात.)

मम्मी : जास्त शहाणपणा करू नका. थोडं मोठं झाल्यावर कळेल तुम्हाला आपोआप!

मामा : बरं चला आता जेवायला तुमास्नी भुका लागल्या असतील नव्हं?

बेबी : (भुकेची आठवण होऊन) बरी आठवण केलीस माझ्या पोटात कावळे कोकलताहेत.

राजू : माझ्या पोटात चिमण्या चिवचिवताहेत. (दोघेही खिदळतात. सारेजण “चला चला” म्हणत स्वयंपाक घरात जायला निघतात. अंधार होऊ लागतो. बेबी आणि राजू “काय ती गरमगरम भाकरी”, “वर ते घरच्याच म्हशीच तूप”, वगैरे बडबडत जातात. अंधार. संगीत. )

प्रवेश तिसरा

(काही क्षणांनी पुन्हा प्रकाश. स्वयंपाक घरातून सर्व मंडळी बाहेर येताना दिसतात. पुढे मामा. )

मामा : (खांद्यावरच्या टॉवेलला हात-तोंड पुसत) काय लेकरांनो, जेवनाचा बेत कसा काय व्हता?

राजू : (ढेकर देत) वा ! एकदम बेस्ट.

बेबी : काय ते घट्ट-घट्ट दही आणि खुसशुखीत तूप!

राजू : (जिभल्या चाटत) व्वा!

बेबी : आणि मामा, गरम-गरम भाकरीसोबत ताज्या माठाची भाजी खायला काय मजा येते रे! गेल्या सहा महिन्यात अशी जेवले नव्हते!

मम्मी : बघितलंत ना वहिनी, ही पोर कशी सवकलीत तुमच्या हातच्या जेवणाला ती!

मामी : असूदे! हितं काय कमी हाय? म्वॉप डोंगरभर पडलंय; खायलाच कुणाचा पत्त्या न्हाय.

राजू : मग आम्ही दोघं इकडच रहायला येतो, काय गं बेबी?

बेबी : (मिटक्या मारत) अरे वा. ग्रेट आयडिया! इकडं जर आपण आलो तर रोज नुसती धमाल...

मामा : आरं पर तुम्ही हिकडं आल्यावर तिकडं साळत कोन जानार, मम्मी अन् पप्पा व्हय?

बेबी : का? त्यांना जायला काय हरकत आहे?

राजू : आपली मुलं शाळेत जायला का कंटाळतात हे तरी समजेल त्यांना!

मामी : आन् समजा तुमचं आई-बा साळंत गेलं तर घरातलं काम कोन करणार? भांडी कोण घासनार? ज्यावान कोन करनार? कापडं कोन धवनार?

बेबी : ते सर्व कामवाली मावशी करेल की!

मम्मी : वहिनी, तुम्ही ह्या कार्ट्यांच्या तोंडाला लागू नका. बोलायला कुणालाही ऐकणार नाहीत ती! बेबी, राजू झोपायला चला आता. रात्र होत आली.

दोघेही : आम्ही नाही एवढ्यात झोपणार...

मम्मी : म्हणजे?

राजू : आमचं मामाकडे काम आहे.

मामा : कसलं काम? काय शंकरदादा कसलं काम आहे यांचं तुझ्याकडं?

मामा : पोरानु,कसलं काम काडलंय आता? काम बीम काय न्हाय आता, चला बगू झोपाय. रात किती झाली बगा! (असं म्हणून तो आत जायला निघतो पण दोघेही त्याला अडवतात. बेबी त्याच्या पाठंगुळीच बसते.)

राजू : (मामाला मिठी मारून प्रेमळ दम देत) मामा, काय ठरलं होतं आपलं?

मामा : काय ठरलं व्हतं?

बेबी : झोपायला जाण्यापूर्वी तू आम्हाला गोष्ट सांगणार होतास, बरोबर?

मामा : आरं तिच्या बायला! मस्नी ध्यानच राहिलं न्हाय बगा. पर आसं बगा पोरानु, उद्या आपल्याकडं बारसं हाय. येरवाळीच उठाया हवं का न्हाय? तवा झोपा आता. उद्याच्याला सांगतु गोष्ट. (दोघंही धिंगाणा घालतात. “आम्ही नाही जा, आम्ही नाही सोडणार तुला", “गोष्ट सांगितलीच पाहिजे”,

“आम्हाला फसवायला बघतोस काय?”, “गोष्ट सांगितल्याशिवाय आम्ही झोपणारच नाही”, वगैरे बडबड करून ते त्याला हैराण करतात. तेव्हा मामी हस्तक्षेप करते.)

मामी : आसं काय करताया धनी? पोरं इक्ता आग्रव धरत्यात तर सांगा की एखादी गोष्ट. नायतं त्यांच्या ह्या कालव्यानं माजं प्वार परत उठायचं (मुलाला नीट पदराखाली घेते.)

मम्मी : दादा, आता मुलं इतका आग्रह करताहेत तर सांग की एखादी गोष्ट. मलापण खूप दिवसात गोष्ट ऐकायला मिळाली नाही, तुझ्या तोंडून.

मामा :  बारं..., समद्यांच्या मर्जीम्होरं माजं काय चालतंय? (असं म्हणत गोष्ट सांगण्याची तयारी करतो. त्याच्या दोन्ही बाजूला राजू आणि बेबी त्याला चिकटून बसतात. शेजारी मामी मुलाला पदराखाली घेऊन बसते. मम्मी विणायच्या सुया घेऊन किंवा असंच काहीतरी काम काढून बसते. मामा गोष्ट सांगायला सुरूवात करतो. हळूहळू त्यांच्यावर मंद निळा प्रकाश पडतो.)

मामा : योक व्हता राज्या. त्यो लई रूपवान होता. पराकरमी व्हता. त्याचं राज्य लयी मोठं व्हतं. सगळीकडं आबादी-आबाद व्हतं. सगळी परजा सुखात व्हती. कुनाला काही कमी पडत नव्हतं. राजा सर्व परजेवर पिरेम करायचा. राजाबी परजेचा लाडका व्हता. लोकांचं त्यांच्यावर लयी पिरेम व्हतं. पर इक्तं समदं असूनबी राजा सुखी नव्हता, आता का म्हनाल, तर राज्याच्या पोटी संतान नव्हतं, वंशाला दिवा नव्हता, राज्याला वारस नव्हता, (हळूहळू अंधार वाढायला लागतो. गोष्ट ऐकणारे पेंगताहेत. रातकिड्यांची किरकिर ऐकू येऊ लागते. मामाचे शद्बही हळूहळू पेंगुळल्यासारखे येतात.) अशेच दिवस जात व्हते, म्हईने सरत होते, वर्स जात व्हती... आन एक दिस राज्याला आनंदाची बातमी समजली. राणी पोटुशी हायली व्हती. आता वंशाला दिवा मिळणार व्हता, राज्याला वारस मिळणार व्हता, परजेला राज्या मिळणार व्हता. व्हता व्हता नऊ म्हैने नऊ दिवस भरले. राणी बाळंत झाली... मुलगा झाला... समदीकडं आनंदी-आनंद झाला...

(गुडुप अंधार. काही क्षण शांतता. मामाचे घोरणे ऐकू येते. त्यानंतर मग दूरवरून कोंबड्याची बांग ऐकू येते. आणखी एक दोनदा ऐकू येते. त्यानंतर ओव्यांचा आवाज ऐकू येतो. पहाट झाली आहे.)

प्रवेश चवथा

(प्रकाश. मामी डोक्यावर पदर घेऊन एका ताटात पेटलेले निरंजन, पूजेचे सामान घेऊन येते. ती आल्यावर मंद प्रकाश येतो. अंगणातल्या तुळशीला हळद कुंकू वाहून पूजा करते. वृंदावनाभोवती प्रदक्षिणा घालू लागते. हे सारे चालू असतांना तिचे गाणे सुरू आहे.)

मामी : (सुरेल आवाजात )

पयली माजी ववी गं पयले माजे वचन

तुळशीचे पूजन गं... रामाच्या पाऱ्यात...

दुसरी माजी ववी गं करून येणी फणी

तुळशीला पाणी गं... रामाच्या पाऱ्यात...

तिसरी माजी ववी गं तिसरं माजं कवन

तुळशीला नमन गं... रामाच्या पाऱ्यात...

( हे सुरू असताना बेबी आणि राजू दोघेही गुपचुप बाहेर येऊन कौतुकाने पहात असतात. तिसरी ओवी संपल्यावर मामीचे त्या दोघांकडे लक्ष जाते.)

मामी : आगं बया बया बया, इक्त्या रामाच्या पारी कशापायी उठला रं पोरांने? (दोघेही हसत आहेत) आन् हसाया काय झालं असं खुसुखुसु?

राजू : अगं मामी, तुझी भाषा ऐकली ना की आपोआप हसू येतं बघ.

मामी : पर ते कशापायी?

राजू : आता ‘रामाचा पारा’ म्हणजे काय?

मामी : ‘रामाचा पारा’ म्हजी... (विचारात. पण नेमकं कसं सांगायचं ते सूचत नाही. आता कसं सांगावं, रामाचा पारा म्हजी... (रेटत) रामाचा पारा!

बेबी : अगं पण म्हणजे नक्की काय?

मामी : म्हंजी आसं बगा... आता ही जी येळ हाय ना, सूर्य उगवण्यापूर्वीची ती कशी अगदी शांत  निवांत आसती का न्हाय? ह्या येळला शिरीराम फिरायला भायेर पडतो. ह्या येळला त्याचं दर्शन व्हतं म्हणून ह्याला रामाचा पारा म्हंतात समजलं?

राजू : (तिची नक्कल करीत) आक्षी बराबर!

मामी : आरं मी तुमची आडानी मामी. मला काय तुमच्यासारकं ते गॉटमॅट बोलता येत न्हाय. करा चेष्टा मामीची!

बेबी : (तिला चिकटत) नाही गं मामी तुझी आम्ही अजिबात चेष्टा करीत नाही. उलट तुझे शब्द इतके गोड वाटतात ना की सारखं तुझं बोलणं ऐकत रहावसं वाटतं.

राजू : बरं का मामी आम्ही इथं येतो ते मामाची गोष्ट आणि तुझ्या ओव्या ऐकायला.

मामी : (त्याला जवळ घेत) खरं म्हणतासा पोरानु?

बेबी : आम्ही खोटं कशाला बोलू? तू जर मुंबईला असतीस ना तर लता मंगेशकर सारखी प्रसिद्ध झाली असतीस.

राजू : आणि मामा पु.ल. देशपांडेसारखा फेमस झाला असता.

मामा : (बाहेर येत) कोन झालो असतो म्या ?

राजू : अरे तू मुंबई पुण्यात असतास तर पु.ल.देशपांडे यांच्यासारखा प्रसिद्ध झाला असतास.

मामा : ह्यो कोन म्हसोबा?

राजू : अरे म्हसोबा काय, विनोदी लेखक होते ते!

मामा : आसं व्हय? बारं... चला आता नदीवर पेवायला येताय न्हवं?

बेबी : अय्याऽऽ नदीवर पोहायला? काय ग्रेट आहेस रे तू! मला पाठीवर बसवशील ना मामा?

मामा : व्हय बशिवतो की!

राजू : मामा मला, नाक धरून पाण्यात बुडी मारायला शिकवशील ना?

मामा : व्हय शिकीवतो की! आन् एऽऽ पारु... तू कशापायी बघत उभी ऱ्हायली? आज बारसं हाय न्हवं? पटापट आटप की समदी कामं. गोठ्यात जाऊन म्हशीला सोड, तवर मी ह्या पोरांना आंघुळ घालून आन्तो...

(सर्वजण जायला निघतात. प्रकाश थोडा वाढतो.)

बेबी : मामा परत आल्यावर मला म्हशीचं दूध काढायला शिकवशील?

मामा : शिकवितो.

राजू : मामा, परत आल्यावर मला फणसाच्या पानाचा बैल करून देशील?

मामा : व्हय, देतू की.

बेबी : मला नदीवर खेकडा पकडून दाखवशील?

मामा : अरं पोरांनो, तुमाला तुमचा हा मामा काय पायजे ते देईल. मामाचं काळीज हवं असलं तरी हातावर काढून देईल, पायजे का बोला?

बेबी : नकोरे बाबा तुझं काळीज आम्हाला. काळीज काढून दिलंस आणि तूच जर राहिला नाहीस तर आम्हाला मामा कोण देईल?

(पटकन ती त्याला चिकटते. तो तिला कडेवर घेतो. दुसऱ्या कडेवर राजू बसतो. त्या दोघांनाही घेऊन मोठ्या कौतुकाने नदीवर जायला निघतो. अंधार होऊ लागतो. अंधारातच बारशानिमित्त लावलेले पुढील गाणे लाऊड स्पीकरवर गाणे ऐकू येते.

अष्टमिच्या राती ग यमुनेच्या काठी,

गोकुळ अवतरले

गोड हसू गालात, नाचू गाऊ तालात,

पैंजण थरथरले

कान्हा दिसतो उठून, गोपी आल्या नटून

नव्या नवतीचा शृंगार केला

आज आनंदी आनंद झाला...)

प्रवेश पाचवा

(पुन्हा प्रकाश उजळतो. बारशाचा कार्यक्रम आटपलेला आहे. दिवसभर धावपळ करून थकलेली मंडळी बोलत आहेत.)

मामी : अख्खा गाव जमला व्हता बारशाला. धावपळीनं कंबर मोडून निघाली अगदी!

मामा : माझा पण जीव मेटाकुटीला आला अगदी.

मम्मी : बायका किती जमल्या होत्या! नारळांचा आणि झबल्यांचा खच पडलाय नुसता!

बेबी : बाळाला खेळणीसुद्धा किती छान छान मिळाली. (असे म्हणून खिशातून एक खुळखुळा काढून बाळाच्या कानाशी आणून वाजवते. त्याबरोबर बाळ रडायला लागते. मामी त्याला हातावरच जोजवत–)

मामी : ओ...ओ...ओ...च्य...च्य...गप...गप... गप की रे माज्या लाडक्या, दमला व्हयं माज्या सोन्या तो? गप... गप... (पण तो गप्प बसत नाही मग त्याला मम्मीकडे देत)

मामी : कमाल केली बाय ह्या पोरानं. सकाळपास्न खाली ठिवून दिलं न्हाय का पान्याचा घोट पिवून दिला नाय. (देत) घ्या जरा!

मम्मी : (घेत) वहिनी इतकं चांगलं सोन्यासारखं सुनील हे नावं ठेवलंय आणि तुम्ही ‘पोर’ का म्हणताय त्याला? चांगलं सुनील म्हणून हाक मारा की! ( ती स्वत: ‘सुनील-सुनील’ अशी हाक मारते. तसा तो रडायचा थांबतो.)

मम्मी : अगबाई इतक्या लहानपणातच आपलं नांव कळायला लागलं वाटतं त्याला.

राजू : मामी तू त्याला सुनील म्हणून हाक मारत जा! वाटल्यास सुन्या म्हण!

बेबी : शीऽ सुन्या नको एकदम गावठी वाटतं... त्यापेक्षा तू त्याला सनी म्हण. सुनील गावस्करला नाही सर्वजण सनी म्हणत. (बेबी एकदम लाडिक आवाजात स ऽऽऽ नी अशी हाक मारून दाखवते. सर्वजण खुषीत टाळ्या वाजवतात.)

मामी : मला न्हाय तसलं सनी का फनी म्हणता येत. त्यापेक्षा मी त्याला सरळ सोन्याच म्हण्णार.

बेबी : शी: सोन्या हे काय नाव आहे? मला नाही आवडत असलं नाव.

राजू : बेबी, तुला जरी ते नांव आवडलं नाही तरी सोन्याला मात्र आवडलेलं दिसतंय... चड्डी पिवळी केली बघ त्यांन... (सर्वजण बघू बघू म्हणत खिदळू लागतात. इतक्यात मामा बाहेरून येतो.)

मामा : (मम्मीला) बरं का ताईसायेब, हणम्याला पाठवला व्हता तालुक्याच्या गावाला रिजवेशन आणायला. उद्या सकाळी सा वाजताची गाडी हाय. येरवाळीच उठावं लागंल... बॅगा तर आताच भराया लागतील! (त्याच्या ह्या बातमीमुळे मुलं नाराज. वातावरण गंभीर.)

मामी : तुमास्नी न्हावा म्हनलं आस्तं पर पोरांची साळा बुडंल, दोन दिवस पोरं आली तं घर कसं गोकुळवानी गजबजलं व्हतं. (डोळे पुसत) आता आजाबात करमायचं न्हाई आमाला.

(दोघेही आवेगानं मामीला कवटाळतात.)

बेबी : मामी, आम्ही आता परत मुंबईला जाणार नाही, तुमच्याकडेच राहणार.

मामा : आसं न्हाय करायचं लेकरांनो.

राजू : (रडत) मामा, मला ती घाणेरडी मुंबई नको, तिथं असे डोंगर नाहीत, झाडं नाहीत, नदी नाही..., तुळशी-वृंदावन नाही, गोष्ट सांगणारा मामा नाही, ओव्या म्हणणारी मामी नाही...

बेबी : मामा, खरचं रे आम्हाला मुंबईचा कंटाळा आलाय. जिथं गोष्ट सांगणारा मामा नाही आणि ओव्या गाणारी मामी नाही तिथं रहाण्यांत काय अर्थ आहे?

मामा : (त्या दोघांना जवळ घेत) लेकरांनो, तुमाला शिकूनश्यान मोठं व्हायचं हाय नव्हं? मोठं व्हयाचं आसल तर म्हमयला गेलच पायजे. तिथल्या मोठ्या साळत शिकलं पायजे. तुमचं आय-बा ही शिकलेली मान्सं आहेत. ती तुम्हाला शिकाया मदत करतील. आमी आडानी, आमच्यासारखं तुमी व्हाऊ नका. आई आणि बाचं नाव बुडवू नका. मोठं व्हा. अगदी आबाळाइक्तं मोठं व्हा. अन् जवा जवा तुमाला वाटल की आता मामा-मामीकडं जावं, तवा पाखरागत उडत या. ह्या मामाच्या घरट्यात तुमच्यासाठी मायेची उब कायम हाय बाबानो! (त्याला एकदम भरून येते. हुंदका  फुटतो. सर्वजण आता त्याच्या बाजूला उभे. संध्याकाळचा कातर प्रकाश सर्वांवर पडला आहे. सर्वजण हळव्या सुरात गाऊ लागतात.)

सर्व: मामाचा गाव मोठा,

सोन्या चांदीच्या पेठा

शोभा पाहून येऊ या,

मामाच्या गावाला जाऊ या

जाऊया...

मामाच्या गावाला जाऊ या!

(दूरवर आगगाडीच्या इंजीनची दीर्घ शिट्टी वाजते तसा हळूहळू अंधार आणि पडदा.)

***

सूचना : एकांकिकेच्या प्रयोगापूर्वी तसेच तिचे भाषांतर, रूपांतर वा अन्य कोणत्याही प्रकारच्या मुद्रित/ डिजिटल माध्यमांतरापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

pralhadjadhav.one@gmail.com | ९९२००७७६२६.

***